अमर चित्र कथा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

क्रमांक ६११ | ₹ ९९



शोध आपल्या संस्कृतीचा

आपल्या जडणघडणीच्या काळाकडे जेव्हा अनेक भारतीय मागे वळून पाहतात, तेव्हा ते त्यांच्या मनावर '**अमर चित्र कथा**'यांच्या चित्ररूपी पुस्तकांनी केलेले संस्कार महत्वाचे मानतात. याच अमर चित्र कथांच्या माध्यमातून त्यांना आपल्या गौरवशाली परंपरेची पहिली ओळख झाली.

१९६७ सालापासून आजपर्यंत अमर चित्र कथांची ४५० पेक्षा अधिक पुस्तके प्रसिध्द झाली असून, आजपर्यंत नऊ कोटींपेक्षा जास्त प्रतींची विक्री संपूर्ण जगभरात झाली आहे.

आज संपूर्ण भारतात १००० पेक्षा अधिक ग्रंथदालनांमध्ये अमर चित्र कथा उपलब्ध आहेत. आपल्या जवळच्या ग्रंथदालनाचा पत्ता जाणून घेण्यासाठी **www.ack-media.com** या संकेतस्थळावर संपर्क करावा. जर ग्रंथदालनात प्रती उपलब्ध नसतील तर, आपण आमचे ऑनलाइन ग्रंथदालन **www.amarchitrakatha.com** येथून सुध्दा पुस्तके मिळवू शकता. तेथून पुस्तकांचे वितरण जगभरात कोठेही त्वरीत केले जाते.

आमच्या या पुस्तकांच्या खजिन्यातून आपले आवडीचे पुस्तक निवडण्यासाठी आम्ही आपल्या सोयीकरीता पुस्तकांची सहा गटात विभागणी केली आहे.

महाकाव्य व पौराणिक
महाकाव्ये आणि पुराणांतील प्रसिध्द कथा

अभिजात भारतीय साहित्य
भारतीय साहित्यातील मनोहारी कथा

बोध आणि विनोद
लोककथा, दंतकथा, बोधकथा आणि विनोदी कथा

वीरगाथा
शौर्यवान भारतीय स्त्री-पुरूषांच्या कथा

युगनिर्माता
भारतीय विचारवंत, समाज सुधारक आणि राष्ट्रनिर्मात्यांच्या कथा


समकालीन अभिजात साहित्य
आधुनिक भारतीय साहित्यातील सर्वोत्कृष्ट कथा


कथा : एस. एस. रेगे **चित्र** : दिलीप कदम **संपादक** : अनंत पै **मुखपृष्ठ**: पी.जी.सिरुर

Amar Chitra Katha Pvt Ltd

ISBN 978-93-5085-170-8
Published by Amar Chitra Katha Pvt. Ltd., Mumbai - 400059, India.
For Consumer Complaints Contact Tel : + 91-2249188881/2
Email: customerservice@ack-media.com
Printed in India.


डॉ. बाबासाहेब आंबेडकर





१४ एप्रिल १८९१ रोजी रामजीची पत्नी भीमाबाई प्रसूत होऊन तिला पुत्र झाला.
आपण त्याचे नाव भीम ठेवूया मोठ्या कीर्तीमान होणाऱ्या मुलाला ते शोभेल. वेळ पडल्यास, आपण उपासही काढू, पण त्याला मात्र काही कमी पडू देणार नाही.
मी आता सुभेदार मेजर झालो आहे. त्याला चांगले शिक्षण देण्यासाठी आपल्याला , उपास पडणार नाहीत.


दोन वर्षानंतर रामजी सैन्यातून निवृत्त झाले व कोकणातल्या दापोलीला त्यानी बिऱ्हाड केले. भीम पाच वर्षाचा झाल्यावर त्याचे शाळेत नाव घालण्यात आले.
तुमच्या थोड्याशा पेन्शनीत आपणाला त्याचे शिक्षण कसे काय परवडणार ?
काही काळजी करू नको ! सर्व ठीक होईल. काही मित्रांनी मला नोकरी पाहून देण्याचे आश्वासन दिले आहे.


लवकरच रामजीना साताऱ्याला नोकरी मिळाली आणि आशा पुन्हा उंचावल्या. पण तोच काही दिवस आजारी असलेल्या भीमाबाईचे निधन झाले आणि कुटुंबावर दुःखाचा वज्राघात झाला.
आईविना पोरक्या झालेल्या माझ्या मुलांचे कसे होणार?
भाऊ, काळजी करू नकोस. मी त्याचे पाहीन आणि छोटया भीमाची तर विशेष काळजी घेईन.
रामजींची बहीण मीराबाई आता मुलांचा संभाळ करू लागली.


सैन्यात मास्तरकी केलेले रामजी आता स्वतः मुलांच्या शिक्षणाकडे ध्यान देऊ लागले.
मुलाना रामायण, महाभारतातील कथा ते वाचून दाखवीत आणि देवाची भजने, अभंग त्याना शिकवीत.
भीमाचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने हायस्कूलात प्रवेश केला. तिथे इतर विद्यार्थ्यांपासून अलग एका कोपऱ्यात त्याला बसविण्यात येत असे.
भीमराव आंबडवेकर!
हजर, गुरुजी.
मध्यंतराची घंटा झाल्यावर सर्व मुले खेळायला व पाणी प्यायला वर्गाबाहेर धाव घेत असत. भीमाला तहान लागली तेव्हा तो पाण्याचे भांडे उचलायला गेला-
अरे अरे ए, पेल्याला शिवू नकोस!


हाताची ओंजळ कर.
मी पाणी ओततो.
भीमाने ओंजळ करून मुकाटयाने जलपान केले, पण ही गोष्ट त्याच्या मनाला लागली.
माझ्यात काय उणीव आहे ? मलाच असे निराळे का वागवतात ?
एकदा भीम आणि त्याचा मोठा भाऊ कोरेगावी नोकरीनिमित्त राहत असलेल्या आपल्या वडिलाना भेटण्यासाठी निघाले. मसूर स्टेशनावर उतरून वडिलांची वाट पहात थांबले.
बाबा कसे आले नाहीत ?
बराच वेळ झाल्यावर स्टेशनमास्तरच्या सहाय्याने त्यानी एक बैलगाडी ठरवली.
कोणाची पोरं रे तुम्ही ?
आम्ही रामजी सकपाळची मुलं.. त्याना भेटायला चाललोत.



रामजी सकपाळची? गाडीतून उतरा खाली आधी महारड्यानो !
दया करा ! आम्हाला उतरवू नका.
आम्हाला कोरेगावला कसं जायचं ते माहीत नाही. आम्ही एकाकी भटकत जाऊ.
मला विटाळलंत, माझ्या गाडीला विटाळलंत, माझ्या बैलांना विटाळलंत तुम्ही !
तुम्हाला हवं तर दुप्पट भाडं देतो. कृपा करा आणि आम्हाला कोरेगावला न्या.
आमचे कपडे चांगले आणि स्वच्छ आहेत तर मग आमच्या स्पर्शानं गाडीला कसा काय विटाळ होतो ?
अखेर पैशाच्या लोभाने गाडीवाल्याच्या मनातल्या विटाळाच्या भीतीवर मात केली.
ठीक! बरं चला ! तुम्ही गाडी हाका. मी मागून चालतो. नंतर गाडी, बैल शुद्ध करून घेईन.
संबंध प्रवासात ह्या घटनेवर भीम विचार करीत होता.
आम्ही माणसं आहोत. तरी देखील आमच्या स्पर्शानं जनावरं आणि निर्जीव खटारेही विटाळले जातात असं म्हणतात. हे कसं आणि का?



छोट्या भीमाला या घटनेचा विसरही पडला असता. पण साताऱ्याला आल्यानंतर काही दिवसानी शाळेतून परतताना आणखी एक अशीच घटना घडली.
तहानेनं घसा अगदी सुकून गेलाय. ह्या विहिरीचं पाणी काढून प्यावं.
पहा, हर हर ! तो अस्पृश्य त्यानं आपलं पहा !
पाणी विटाळून टाकलं.
दुसऱ्याच क्षणी-
सोडा, सोडा मला ! मी काय गुन्हा केला?
हलकटा ! पुन्हा वर उर्मट - पण बोलतोस!
भीम मुसमुसून रडू लागला.
पुढं मोठं होता होता असे अनेक अपमान त्याला सहन करावे लागले..
भीमा, अरे तुझे केस किती वाढलेत ! चल, मी ते कापते.
माझ्या शाळेतल्या इतर मुलांसारखे न्हाव्याकडून का नाही कापून घ्यायचे?



त्याच्या बहिणीच्या डोळ्यांत पाणी आलं.
आपण महार अस्पृश्य आहोत.
पण का? आपण निराळे कसे ?
मला माहीत नाही. हे असंच चालत आलंय आजपर्यंत.
बहिणीच्या हया उत्तरानं भीमाचं समाधान झालं नाही.


दयाळू वृत्तीचे ब्राह्मण गुरुजी आंबेडकर हे भीमाचे एक आशास्थान होते.
शाब्बास! सर्व गणितं तू अगदी बरोबर सोडवली आहेस.
तेच एक फक्त मला आपल्याजवळ येऊ देतात.


दुपारच्या मधल्या सुटीत-
इकडे ये, भीम ! बस खायला माझ्या बरोबर.
पण, गुरुजी...
तुझ्या गुरुजीसोबत तू बसणार नाहीस काय ? चल बैस ? आपण दोघं खाऊया.


एकदा असेच ते दोघे न्याहरी करीत असताना-
भीमा, तुझं आंबडवेकर आडनाव बदलून आंबेडकर करणार आहे मी.
गुरुजी, जशी तुमची इच्छा.
एके रात्री मीरा आत्यानं मुलाना हाक मारली.
बाळानो, लवकरच तुम्हाला एक नवी आई मिळणार आहे. बाबानी पुन्हा लग्न करण्याचं ठरवलं आहे.
अंहं! नाही नाही.
ती माझ्या बयेचे दागिने व कपडे वापरील आणि तिचा संसार चालवील. छे, छे! कदापि नाही. मी मुळीच इथं राहणार नाही.
मी मुंबईला पळू जाईन व नोकरी करीन. पण तिथं जायला पैसे कुठून आणायचे ? मी आत्याचा बटवा पळवीन.
त्याने तीन रात्री तसा प्रयत्न केला, पण ते जमलं नाही. चौथ्या रात्री मात्र -
हं! सापडला बटवा एकदाचा.


उत्सुकतेनं त्यानं बटवा उघडला -
आं! फक्त एक ढब्बू पैसा ! बिचारी माझी आत्या ! आणि हयासाठी मी तिची चोरी करणार होतो !
भीमाने पैशासकट तो बरवा जागी ठेवला आणि तो झोपी गेला.
या माझ्या पापाबद्दल, देवा, मला क्षमा कर. मी माझं वर्तन सुधारीन. मी खूप अभ्यास करीन आणि मोठा झाल्यावर तिला सुखात ठेवीन.
भीमानं त्यानंतर अभ्यासात मन घातलं आणि आपल्या शिक्षकांकडून वाहवा मिळवली.
रामजी, तुमचा मुलगा फार हुशार आहे. चांगलं शिक्षण मिळाल्यास तो त्याचं चीज करील.
गुरुजी, तसे करण्याचा मी जरूर प्रयत्न करीन.
रामजी मुलाबाळांसह नंतर मुंबईला आले. परळच्या कामगार वस्तीतल्या एका चाळीत त्यानी खोली घेतली. स्वयंपाक, झोपणं आणि अभ्यास हे सर्व व्यवहार एका खोलीतच होत.
भीमा, ह्या सर्व गडबड गोंधळात तुझा अभ्यास होणार नाही. तू आता झोप. मी तुला दोन वाजता अभ्यासासाठी उठवीन.
बरं, बाबा !



आणि भीम जमिनीवर झोपी गेला -.
पहाटे दोन वाजता-
भीमा, उठायची वेळ झाली.
सगळेजण झोपेत असताना भीम अभ्यास करी.
एक दिवस मुंबईच्या एलफिन्स्टन विद्यालयात-
भीमा, इकडे फळ्याकडे ये.


हजेरी ह्या मोठया नगरातही जातीयता प्रचलित होती.
सर! थांबवा त्याला. तो अस्पृश्य आहे.
अरेरे, आमचा निकाल लागला
आमचे खाण्याचे डबे फळ्यापाठी आहेत. तो त्याना विटाळील.
पुन्हा एकदा-
सर! दुसरी भाषा म्हणून संस्कृत मला घ्यायची आहे.
ते शक्य नाही ! संस्कृत अस्पृश्यांसाठी नाही. तू पर्शियन भाषा घेऊ शकतोस.
असे सर्व अपमान सहन करतानाही भीमाने नेटाने अभ्यास केला. चर्नी रोडच्या बागेत तो अभ्यासासाठी जात असे. तिथे अनेकदा विज्ञान व समाजसुधारक असलेल्या केळुस्कर गुरुजींची व त्याची भेट होई.
भीमराव, तुझा अभ्यास कसा काय चाललाय?
मी खूप अभ्यास करतो, सर.
मॅट्रिकच्या परीक्षेत यश प्राप्त करणारा महार जातीतला भीम हाच पहिला मुलगा असल्यामुळे त्याच्या गौरवासादी समाजाने सभा भरवली. गुरुवर्य केकुस्करानीही ह्या गौरवसमारंभात भाग घेतला. सुप्रसिद्ध समाजसुधारक श्री. श्री. के बोले अध्यक्षस्थानी होते.
माझ्या आशीर्वादाचं प्रतीक म्हणून बुध्दाच्या जीवनावरील माझं नवं पुस्तक मी तुला भेट देत आहे.


सभेनंतर –
रामजी, तुमच्या हुशार मुलाबाबत पुढं काय करणार आहात ?
केळुस्कर साहेब, प्रथम त्याचं लग्न करण्याचा आमचा विचार आहे.
त्याकाळी बाल-विवाह रूढ होता.
पण त्याच्या शिक्षणाचं पुढं काय ?
काही झालं तरी मी त्याला पुढं नक्की शिकवणारच.
भीमाचा रमाबाईशी विवाह झाला.
अतिशय ताण पडत असतानाही हाती, असलेल्या पैशातून रामजींनी त्याच्या शिक्षणावरचा खर्च चालूच ठेवला. पण भीम जेव्हा इंटर आर्ट्स पास झाला तेव्हा -
बाबा ! अजून माझ्या कॉलेजची फी तुम्ही मला दिलेली नाही.
बेटा! माझ्याजवळ पैसे नाहीत.
बाबा, मग मी काय करू? यापूर्वी दोनदा मला कॉलेजने फी भरण्याची सूचना दिली आहे. फी शिवाय आज कॉलेजला मी जाणार नाही.


त्या निराशामय अवस्थेत रामजीना केळुस्कर मास्तरांच्या दयालू वृत्तीचं स्मरण झाले आणि ते त्यांना भेटले. केळुस्करानीही तत्काळ उपाय सुचवला.
काही काळजी करू नकोस, रामजी. मी भीमरावाला बडोद्याच्या सयाजीराव गाय- कवाड महाराजी कडे घेऊन जातो. मला खात्री आहे ले मदत करतील.
आणि लवकरच-
बाबा, गायकवाड महाराजानी मला पंचवीस रुपयांची मासिक शिष्यवृत्ती दिली आहे. आता पुढं तुम्हाला काळजी करण्याचं मुळीच कारण नाही.
फारच छान ! मला केळुस्कर साहेबांचे आभार मानले पाहिजेत.
भीम १९१२ साली बी.ए. झाला.
मला बडोदे संस्थानात सरकारी नोकरी देऊ केलेली आहे. पण पगार अगदी थोडा आहे.
भीम बडोद्याला जाऊन पंधरवडा झाला तोच एक वाईट बातमी त्याच्या कानी आली.
बाबा फार आजारी. ताबडतोब ये.
भीम मुंबईला परतला. २ फेब्रुवारी १९१३ रोजी वडिलांचं निधन झालं तेव्हा तो त्यांच्याजवळ होता.
बाबा, आम्ही पोरके झालो. आता सल्लामसलती साठी कोणाच्या तोंडाकडे आम्ही पाहायचं?
पण रामजीबाबानी आपल्या मुलाच्या भावी कर्तृत्वाचा पाया घातलेला होता.


भीमराव पुन्हा केळुस्करांकडे मार्गदर्शनासाठी गेला.
मला वाटतं तू बडोद्याच्या महाराजाना भेटावंस. काही विद्यार्थ्यांना परदेशी विद्याभ्यासासाठी पाठविसण्याची त्यांच्या संस्थानची योजना आहे.
लौकरच-
मी आत्ताच बडोद्याहून आलो. माझी निवड झाली आहे, पण विद्याभास पूर्ण झाल्यावर दहा वर्ष बडोदे संस्थानची नोकरी करण्याचा मला करार करणं प्राप्त आलं.
१९१३ च्या जुलै महिन्यात भीमराव न्यूयॉर्कला पोहोचला.
इथं मला कसं मोकळं मोकळं वाटतं. मला कसलीही समाजबंधनं नाहीत. माझ्या मनास येईल ते मी करू शकतो.
अमेरिकेत स्वतंत्रता आणि समतेचा भीमरावांला येणारा अनुभव खरोखरचं अपूर्व होता.
दररोज जवळ जवळ अठरा तास विद्यार्जनात तो घालवत असे.
१९१५ साली त्याने एम्. ए. पदवी प्राप्त केली आणि पुढल्याच वर्षी पी. एच डीही.
नियोजित समयापेक्षा कमी वेळात अमेरिकेतील विद्याभास पूर्ण झाल्यामुळे भीमराव लंडनला गेला.
मला कायद्याची पदवी मिळवली पाहिजे. तसंच अर्थशास्त्राचा पुढील अभ्यासही मला करायचा आहे.


पण बडोद्याच्या दिवाणानी आंबेडकराना भारतात परतण्याची सूचना केली. बडोद्याला ते आले तेव्हा स्टेशनवर कोणीही सरकारी अधिकारी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित नव्हता.
बडोदे


राहण्याच्या जागेसाठी ते सर्व हॉटेलांतून हिंडले. पण त्याना कुठेच खोली मिळू शकली नाही.
तुम्हीच ते नवे अधिकारी ना! माफ करा, अस्पृश्यासाठी आमच्याकडे जागा नाही.
अखेरीस त्याना एका पारशांच्या वसतीगृहात जागा मिळाली. पण तीही नाव बदलून छुपेपणा पत्करल्यानंतरच.


दुसऱ्या दिवशी ते कार्यालयात गेले तेव्हा विटाळ होऊ नये म्हणून शिपायाने तिथले जाजम गुंडाळून ठेवले होते.


कार्यालयात त्यांचे टेबल एका कोपऱ्यात मांडलेले होते. फायली देण्यासाठी सुद्धा शिपाई त्यांच्याजवळ जात नसे.
ही घ्या फाइल!
वसतीगृहाच्या पारशांना ते खरे कोण हे जेव्हा समजलं-
मी हिंदू आहे.
तू कोण आहेस?
मुळीच नाही! तू एक नीच महार आहेस
चालता हो इथून.
मी जातो, पण मला थोडा अवधी द्या.
एक क्षणभरही नाही! आत्ताच चालता हो !
आंबेडकर बेघर झाले होते. शहरात त्याना कोणीच आश्रय देत नव्हता.
जिथं मला मानानं राहता येत नाही तिथं मला मुळीच राहावयाचं नाही.


वैताग येऊन त्यानी बडोदे सोडलं आणि ते मुंबईला आले आणि हुंड्या रोरव्यांबाबत सल्ला देणारी पेढी त्यानी सुरू केली. पण तिथेही-
तुम्ही आंबेडकरांचा सल्ला घेता का?
होय! ते तज्ञ आहेत.
ते अस्पृश्य आहेत हे तुम्हाला माहित नाही वाटतं?
अस्पृश्य! मग यापुढं मी त्यांच्याकडं जाणार नाही.
आंबेडकराना पेढी बंद करावी लागली.
नोव्हेंबर १९१८ मध्ये त्याना सिडनहॅम कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी मिळाली.
आमच्या महाविद्यालयातले ते सर्वोत्कृष्ट प्राध्यापक आहेत.
होय, ते खरोखरच हुशार, विद्वान आहेत.
त्याना यथायोग्य पगार असूनही ते काटकसरीने राहत.
घरखर्चासाठी मला आणखी जास्त देता येत नाही याचं वाईट वाटतं. अभ्यास पूर्ण करण्यास लंडनला जाण्याकरिता मला पैसा जमवायचा आहे.
काळजी करू नका. मी कसंबसं संभाळीन.
आंबेडकरांच्या अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून कर्तव्यदक्ष रमाबाई जपत असे.
अंहं! छोटा यशवंत आजारी असल्यांचं त्याना मुळीच सांगणार नाही. त्याना शांतपणे अभ्यास करू दे.


दोन वर्षानंतर-
रमे, कोल्हापूरच्या महाराजानी मला मदत देऊ केली आहे. आणि माझा मित्र नवल भाटेना हयाने पैसे उसने देण्याचे कबूल केलं आहे. आता मी लंडनला जाऊ शकेन.
बरं झालं बाई!
लंडनला गेल्यावर आंबेडकरानी आपला अर्थशास्त्राचा अभ्यास पुन्हा सुरू केला आणि त्याबरोबरच ग्रेज इनमध्ये बॅरिस्टरीच्या टर्म्स भरण्यास सुरवात केली. अभ्यासास आवश्यक असणारी सर्व पुस्तकं विकत घेण्यास लागणारा पैसा त्यांच्या जवळ नव्हता
ब्रिटीश म्युझियममध्ये सकाळपासून संध्याकाळ पर्यंत बसून मला अभ्यास केला पाहिजे.
हॉटेलात दुपारचा खाना घेणं त्याना परवडण्यासारखं नव्हतं म्हणून ग्रंथालयात जाताना सँडविचीस घेऊन ते जात आणि बसल्याजागी दुपारी खात. एके दिवशी-
ग्रंथपालानी ऑफिसमध्ये तुम्हाला बोलावलंय.
ग्रंथालयात खाद्य पदार्थ आणून तुम्ही नियमभंग केला आहे. तुम्ही ग्रंथालय सोडून ताबडतोब जावं हे बरं!
माझ्यावर कृपा करा. ह्यावेळी मला क्षमा करा. मी पुन्हा असं करणार नाही.



दररोज सकाळपासून संध्याकाळ पर्यंत वाचत असताना तुम्ही मला दिसता. इतरांसारखी दुपारच्या भोजनासाठी तुम्ही सुटी का नाही घेत ?
मला दुपारचं भोजन बाहेर घेणं परवडण्यासारखं नाही. मी सकाळच्या न्याहरीतलं एक सँडविच काढून ठेवतो आणि दुपारी ग्लासभर पाण्याबरोबर ते खातो.
ह्या शिस्तबद्ध ज्ञानप्रेमी तरुण विद्यार्थ्याची करुण स्थिती ऐकून ग्रंथपालाचं मन द्रवलं.
बरं, यावेळी तुला सोडतो. पण एका अटीवर यापुढे तुला माझ्या खोलील माझ्याबरोबर दुपारचे भोजन केले पाहिजे.
त्या इंग्रजाने केलेली सूचना डॉ. आंबेडकरानी कृतज्ञतेनं मान्य केली.
१९२३ साली ते अर्थशास्त्रज्ञ आणि बॅरिस्टर होऊन भारतास परतले. पण -
माझ्या पदव्या निरर्थक ठरल्या आहेत. माझ्या वकिलीतही अस्पृश्यता मला नडते आहे. माझ्या समाजाच्या उद्धारासाठी मला झटलं पाहिजे.
काही दिवसांनंतर सरकारी फलवा निघाला की शासकीय मदत मिळणाऱ्या कोणत्याही संस्थेत अस्पृश्यांना प्रवेश नाकारता कामा नये.
हे त्या महार आंबेडकराचंच काम असलं पाहिजे.
त्याला दोष देण्यात काय अर्थ ! आपणात ल्याच श्री. के. बोल्यांनी हे बिल मांडलं होतं.
उपहार गृह


आंबेडकरानी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना करून तिच्यातर्फे वसतीगृहे, शाळा आणि मोफत वाचनालये सुरू केली. एके दिवशी-
मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर तुमची नियुक्ती झाली ह्याबद्दल अभिनंदन! मला खात्री आहे तुम्ही तिचं चीज कराल.
अस्पृश्यांचं भवितव्य सुधारण्यासाठी मला शक्य होईल ते सर्व मी करीन.



१९ मार्च १९२७ रोजी महाडला दलित समाजाची परिषद भरली, तिच्या अध्यक्षस्थानी बाबासाहेब या नावाने आता सर्वपरिचित झालेले डॉ. आंबेडकर होते.
मनातल्या उच्च नीचतेच्या कल्पना समूळ नष्ट करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. आपण जर स्वावलंबन शिकलो आणि स्वाभिमान प्राप्त केला तरच आपला उद्धार होईल.


स्वातंत्र्याचं दान केलं जात नाही. त्यासाठी झगडावंच लागतं! चार वर्षांपूर्वी महाड नगरपालिकेने चवदार तळे सर्वांना खुले केले. पण आपल्यातल्या कोणीही आजपर्यंत तिथले पाणी काढले नव्हते. आज आपण ते काढणार आहोत.


आंबेडकर आपल्या अनुयायांसह चवदार तळ्यावर गेले.
तळ्यातून पाणी काढायचं? हिम्मत आहे काय आपली ते करण्याची?
बाबासाहेब काय करताल बघू.


तळ्याजवळ गेल्यानंतर आंबेडकरानी ओंजळीत पाणी घेतले.



आणि ते प्यायले.
करून दाखवलं त्यांनी.


ही एक अपूर्व परिणामकारक घटना होती. आंबेडकरानी आपल्या अनुयायांच्या मनातील भीतीची भुते हुसकून लावली होती. त्या हजारो लोकांनी मग त्या सार्वजनिक तळ्याचे पाणी प्राशन केले आणि एक विशेष इतिहास घडविला.



दलितांचा जमाव तिथून पांगल्यावर काही उच्चवर्णीयांनी सभा घेतली.
'आपलं तळं भ्रष्ट झालं!'
त्या लोकाना धडा शिकवलाच पाहिजे.


हाली दगड घेऊन सवर्ण हिंदू सभास्थानी आले. बरेचसे प्रतिनिधी अगोदरच निघून गेले होते. आणि काही जाण्याच्या तयारीत होते.
मारा त्यांना.
कोणालाही सोडू नका.


नंतर त्यांचे अनुयायी बाबासाहेबांकडे धावून गेले तेव्हा-
अत्याचार मोकाट चालू आहेत.
साहेब, अनुज्ञा द्या. आम्ही त्यांचा निकाल लावून टाकतो.
छे, छे! दंगा मुळीच उपयोगी नाही. आपण काहीही बेकायदा करता कामा नये. आम्ही शांततेने चळवळ करू असे आश्वासन मी दिले आहे.
मी सांगेन त्याप्रमाणे माझे लोक वागतील असे आंबेडकरानी पोलिसांना वचन दिले होते. त्यानी रक्तपात टाळला.



नवीनच सुरू केलेल्या आपल्या 'बहिष्कृत भारत' हथा पत्रात, ३ मार्च १९३० रोजी नाशिकच्या काळा- राम मंदिर प्रवेश सत्याग्रहाची त्यानी घोषणा केली. त्याप्रमाणे त्यांच्या अनुयायानी मंदिराच्या प्रवेश- द्वारी सत्याग्रह सुरू केला.
श्री काळाराम मंदिर पंचवटी
देवाच्या वार्षिक रथोत्सवाच्या आदल्या दिवसा पर्यंत सुमारे एक महिनाभर हा सत्याग्रह चालू होता.
ठीक आहे, दोन्ही बाजूचे पहिलवान रथ ओढून नेतील.
तसे असेल तर हा सत्याग्रह आम्ही थांबवू.
पण आंबेडकरांच्या अनुयायांना फसविले गेले. त्यांच्यादेखतच रथ वेगाने खेचून नेण्यात आला.
आपल्यावर दगडफेक करताहेत.
करू द्या. आपण खंबीर राहू.
आंबेडकरांच्या अनुयायांनी सत्याग्रह चालूच ठेवला आणि मंदिर जवळ जवळ वर्षभर बंद राहिले.


मधल्या काळात महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीला वेग आला होता. १९३० मध्ये ब्रिटीश सरकारने भारताची घटना बनविण्यासाठी लंडनमध्ये एक गोलमेज परिषद भरवली. तिला दलितांचे प्रतिनिधी म्हणून आंबेडकर हजर राहिले.
इंग्रजी राजसत्ता जाऊन तिच्या जागी भारतीय लोकशासन अधिष्ठित करावे हबा मागणीला भारतातल्या दलित वर्गाचाही पाठिंबा आहे. आमच्यावर झालेले अन्याय हे शल्यांसारखे टोचत असूनसुद्धा दीडशे वर्षांच्या इंग्रजी राजवटीत त्यावर उपाय केले गेले नाहीत. मग असली राजसत्ता कोणाला हवी ?
नंतर लौकरच दुसरी गोलमेज परिषदही बोलावली गेली. पहिल्या परिषदेवर बहिष्कार घातलेल्या महात्मा गांधीनी काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधित्व करण्याचे मान्य केले. लंडनला जाण्यापूर्वी गांधीजींच्या विनंतीवरून मुंबईतल्या मणिभुवनमध्ये आंबेडकर त्यांना भेटण्यास गेले.
पहिल्या गोलमेज परिषदेतल्या तुमच्या भाषणांचा वृत्तान्त माझ्या कानी आला आहे. त्यावरून तुम्ही एक सच्चे देशभक्त आहात। हे मला जाणवले.
लंडनमध्ये दुसऱ्या गोलमेज परिषदेत -
भारतीय दलित समाजाकरिता स्वतंत्र मतदारसंघाची मी मागणी करतो. हिंदू धर्माने आम्हाला फक्त अपमान, दारिद्र्य आणि मानहानी दिली आहे.


परिषद अनिर्णायक अवस्थेतच पार पडली. पण जगाच्या दृष्टोत्पत्तीस अस्पृश्यांची करूण स्थिती ज्यानी आणली त्या आंबेडकरांच्या धैर्याचे ते मुंबईला परतल्यानंतर फार कौतुक झाले.
आंबेडकर की जय !
मला देव मानू नका अशी विनंती करतो.
आंबेडकरांची पत्नी अत्यंत धार्मिक वृत्तीची होती.
आपण पंढरपूरला जाऊया. मला विठोबाचे दर्शन घेण्याची तीव्र इच्छा आहे.
पण रमाबाई, आपल्याला मंदिरात प्रवेश मिळणार नाही.
काही हरकत नाही. आपण देवळाबाहेर उभे राहू आणि देवाचे दर्शन घेऊ.
छे! मला ते मुळीच पसंत नाही.
त्यानी पत्नीची समजूत घातली.
जिथे आपल्याला देवापासून दूर ठेवले जाते त्या पंढरपुरची कसली काळजी करतेस ? सदाचारी जीवन, निःस्वार्थी सेवाभाव आणि पददलित समाजाच्या हितासाठी! केलेला निष्कलंक त्याग ह्यांतूनच आपण नवीन पंढरपूर निर्माण करू!


त्यांचे घर हे खरोखरच अस्पृश्यांचे पंढरपूर झाले होते. आंबेडकर त्याना मुक्तिदातेच वाटत असत.
बाबासाहेब, सरकारने आपल्याला स्वतंत्र मतदारसंघ बहाल केलेत.
छान ! आपण पहिली फेरी जिंकली.
पण गांधीजी जातीच्या आधारे होणाऱ्या मतदार संघाच्या ह्या आखणीविरुद्ध होते. ते त्यावेळी येरवड्याच्या तुरुंगात होते. निषेध दर्शविण्यासाठी त्यांनी तिथे उपवास आरंभला. मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय नेत्यांच्या एका सभेत -
डॉ. आंबेडकर, तुम्हीच एकटे गांधीजींचे प्राण वाचवू शकाल. कृपा करून त्यांचे म्हणणे मान्य करा.
आंबेडकरानी आपली भूमिका स्पष्ट केली.
जरी तुम्ही मला जवळच्या दिव्याच्या खांबावर टांगून फाशी दिलेत तरी माझ्या बांधवांच्या न्याय्य व कायदेशीर हक्कांबाबत त्यांच्याशी मुळीच बेहमानी करणार नाही.
नंतर ते गांधीजींना येरवड्याच्या तुरुंगात भेटले.
आपण सर्व एक व अविभक्त राहिले पाहिजे. हिंदूधर्माला स्वेच्छेने आपल्या भूतकाळातील पापांचे क्षालन, करण्यास अखेरची संधी द्या.
मी विचार करून पाहतो.



हथा पेचप्रसंगातून मार्ग दिसत नव्हता. अखेरीस विभक्त मतदार संघांऐवजी अस्पृश्यांना अधिक प्रतिनिधित्व देण्यात यावे अशा अटीच्या पुणे करारावर स्वाक्षरी करण्यास आंबेडकरानी मान्यता दर्शविली.
जाती तत्त्वावर लोकांचे होणारे विभाजन अखेर टळले.



राजकारणात क्रियाशील राहूनही त्यांचा विद्याव्यासंग चालूच होता. त्यांच्या अपूर्व ग्रंथालयात त्यानी पन्नास हजारांवर ग्रंथांचा संग्रह केला होता. त्यासाठी उत्तर मुंबईत दादर येथे त्यानी सुयोग्य बंगला बांधला होता व त्याला 'राजगृह' असे नाव ठेवले होते.


१९३५ च्या मे महिन्यात आंबेडकरांच्या जीवनात एक दुःखद घटना घडली. त्यांची प्रिय पत्नी रमाबाई निवर्तली.



मधल्या काळात, पुणे करार फक्त कागदोपत्री राहिल्याचे आढळताच आंबेडकर व्यथित झाले होते. अस्पृश्यांच्या येवले येथे झालेल्या परिषदेत -
माणुसकीचे साधे अधिकारही आपणास मिळवता आले नाहीत मी हिंदू म्हणून जन्मास आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मात्र मी हिंदू म्हणून मरणार नाही है तुम्हाला निक्षून सांगतो.



महार समाजाच्या परिषदेत बोलताना.
"जो धर्म तुम्हाला माणसं म्हणून ओळखत नाही.... जो अडाणी लोकांना अडाणी आणि गरिबांना गरीबच ठेवण्याची सक्ती करतो तो धर्म नसून ती एक बला आहे".
भारतीय सरकारच्या १९३५ च्या कायद्यान्वये पहिल्या निवडणुकींना प्रारंभ झाला.
आपल्या नव्या पक्षातर्फे स्वतंत्र मजूर पक्षातर्फे मी तुम्हाला आवाहन करतो.
स्वतंत्र मजूर पक्षाचे डॉ. आंबेडकर आणि इतर चौदा जण मुंबई लेजिस्लेटिव असेम्ब्लीवर निवडून आले.
१९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजिनामे दिले. जुलै १९४२ मध्ये व्हाइसरॉयनी आपल्या एक्झिक्युटिव कौन्सिलात मजूरमंत्री म्हणून आंबेडकरांची नियुक्ती केली. त्यांच्या गौरवार्थ झालेल्या एका समारंभात-
माझा जन्म गरिबांत झाला आहे, मी गरिबांत वाढलो आहे. त्यांच्यामध्ये राहिलो आहे, दमट जागेत कट्यावर त्यांच्याप्रमाणे झोपलो आहे. त्यांची सर्व दुःखे आणि अडचणी मी स्वतः भोगलेल्या आहेत. या नवीन अधिकार प्राप्तीमुळे माझ्या मित्रांच्या आणि इतर जनांच्या बाबतीत माझ्या वृत्तीत काहीही फरक पडणार नाही.
१९४२ मध्ये त्यानी ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट्स् फेडरेशनची स्थापना केली. त्यानी खूप परिश्रम घेऊनही सप्टेंबर १९४५ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये फेडरेशनला अपयश आले.


१९४६ मध्ये आंबेडकर घटना समितीवर निवडून आले. त्यांच्या पहिल्या भाषणात थोर मनाचे पुन्हा दर्शन झाले.
आपल्यांत जरी जाती नि पंथ अनेक असले तरी आपण एक राष्ट्र होऊ या विषयी माझ्या मनात संदेह नाही.
घटना समितीच्या तिसऱ्या अधिवेशनात, अस्पृश्यतापालन हा गुन्हा ठरवणारा ठराव संमत झाला.
ऑगस्ट १९४७ मध्ये जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री झाले.
किती हा अपूर्व सन्मान! हा थोर पुरुष आपल्या समाजाला नक्की मान आणि दर्जा मिळवून देईल.
भारताची घटना तयार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अध्यक्षस्थानी घटना समितीनं डॉ. आंबेडकराना नियुक्त केलं आणि जगातील महत्तम लोकशाहीची घटना तयार करण्याचा भार त्यांच्यावर पडला.
घटनेचा कच्चा खर्डा पूर्ण झाल्यानंतर आंबेडकर आजारी पडले. मुंबईच्या एका रुग्णालयात त्यांची व डॉ. शारदा कबीर ह्यांची भेट झाली.
एप्रिल १९४८ मध्ये त्यानी शारदाबाईशी विवाह केला.



४ नोव्हेंबर १९४८ रोजी डॉ. आंबेडकरानी घटना समितीला घटनेचा खर्डा सादर केला.
ज्या जातिभेदामुळे सामाजिक जीवनात तट पडले आणि जातीजातील मत्सर आणि तिरस्कार निर्माण झाला आहे त्या जाति- भेदाचा त्याग करून भारतीयांनी एक राष्ट्र बनावे असे मी आवाहन करतो.
२६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने भारतीय जनतेतर्फे घटना स्वीकृत केली.
सिलोनला भरलेल्या बौद्ध परिषदेला डॉ. आंबेडकराना आमंत्रण होते. तिथून परतल्यावर मुंबईतल्या बुद्धमंदिरात त्यानी भाषण केले.
आपले हाल संपावे असे जर वाटत असेल तर लोकानी बौद्ध धर्म स्वीकारला पाहिजे. भारतात बौद्धधर्माचे पुनरुज्जीवन आणि प्रसार व्हावा यासाठी मी माझे उर्वरित आयुष्य वेचणार आहे.
पुढील आठ वर्षांत सामाजिक अन्याय व खुळ्या धार्मिक समजुतींविरुद्ध डॉ. आंबेडकरानी तीव्र लढा दिला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे आंबेडकरानी बौद्ध धर्म स्वीकारला.


त्यानंतर तीन लाखाहून जास्त असलेल्या अनुयायांच्या मोठ्या समुदायाला त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा दिली.
बुद्धम सरणं गच्छामि.
बुद्धम सरणं गच्छामि.


सात सप्ताहानंतर ६ डिसेम्बर १९५६ रोजी दिल्लीतल्या त्यांच्या निवासस्थानी डॉ. आंबेडकरांचे निधन झाले. दुसऱ्या दिवशी त्यांचे वाव मुंबईला नेण्यात आले. त्यांची अंत्य यात्रा दोन मैल लांबीची होती. अशी अंत्य यात्रा मुंबई नगरीने ह्यापूर्वी कधीही पाहिली नव्हती.


दादरच्या स्मशानभूमीत त्या सायंकाळी मोठमोठ्या नेत्यांनी बाबासाहेबांना अखेरची श्रद्धांजली वाहिली. बौद्ध धर्माप्रमाणे अंत्य संस्कार करून चिता पेटविली गेली. आणि भारतमातेच्या दलित मुलां बाळांसाठी ज्याने शौर्याने जन्मभर लढा दिला असा तिचा थोर सुपुत्र विश्रांत झाला.

श्रद्धांजली



मला असं वाटतं की हिंदू समाजातील सर्व जुलमी प्रवृत्तीविरुद्ध बंड करणारे म्हणून डॉ. आंबेडकरांचे प्रामुख्याने स्मरण राहील, त्यानी ज्या ज्या गोष्टींविरुद्ध बंड केले त्या त्या गोष्टीविरुद्ध आपण बंड करावयास हवे होते आणि काही अंशी आपण तसे केलेही. त्यांच्या मतांशी आपली मते जुळोत, वा न जुळोत पण मी असे निस्संशय म्हणतो की त्यांची जिद्द, चिकाटी आणि विरोधाचे सामर्थ्य ह्यामुळे लोकांची मने जागृत झाली आणि अविस्मरणीय घटनांकडे दुर्लक्ष करता येणे त्याना अशक्य झाले तसेच परंपरेने दुःख भोगीत असलेल्यामध्येही त्यामुळे नवचैतन्य निर्माण झाले.

-पंडित जवाहरलाल नेहरू

आंबेडकर हे आपल्या घटनेचे शिल्पकार आहेत आणि त्यांची विविध क्षेत्रांतील सेवा, विशेषतः दलितांच्या उद्धाराकरिता केलेले कार्य फार महनीय आहे.

- डॉ. राजेन्द्र प्रसाद

आंबेडकर एक अत्यंत प्रामाणिक गृहस्थ होते. ते कुशाग्र न्यायशास्त्रतज्ञ, अभिमानी आणि दृढनिश्चयी वृत्तीचे होते. ते प्रगाढ विद्वान असून सरळ मनाने त्याना भेटणा-यांशी ते जिव्हाळ्याने वागत.


- राजगोपालाचारी


देशातील सामाजिक जीवन पद्धतीत बदल घडून येत असता त्याना गती देणाऱ्यांपैकी आंबेडकर हे एक होते, आणि ह्या बदलाचे महत्व असे होते की त्यामुळे लक्षावधी लोकांचे जीवन अधिक चांगले आणि सुखद होणार होते.


-उ. नु., ब्रह्मदेशाचे पंत प्रधान


डॉ. बाबासाहेब आंबेडकर

अत्यंत प्रतिकूल अशा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अविरत संघर्ष केला. भारतातील 'अस्पृश्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजबांधवांना त्यांनी 'माणूस' म्हणून जगण्याचे अधिकार मिळवून दिले. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश त्यांनी आपल्या अनुयायांना दिला. हिंदू धर्मातील सामाजिक अन्याय आणि खुळया धार्मिक समजुतींविरूध्द त्यांनी तीव्र लढा दिला. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे आपल्या लाखो अनुयायांसह त्यांनी बौध्द धर्म स्विकारला.









ISBN 978-93-5085-170-8